Public Affairs Office
U.S. Consulate General, Mumbai
PRESS RELEASE
AMERICAN CENTER, 4 New Marine Lines, Mumbai 400 020
Tel: 91-22-2262-4590 Fax: 91-22-2262-6800
E-mail: MumbaiPublicAffairs@state.gov Web: http://mumbai.usconsulate.gov

२५ मे, २०१०

नॉन- इमिग्रंट अमेरिकी व्हिसा अर्जासाठी फी आकारण्याची नवीन पद्धत

मुंबई, जून ४, २०१० पासून जगभरातील सर्व अमेरिकी व्हिसा विभागामध्ये नॉन- इमिग्रंट व्हिसा अर्जासाठी नवीन द्विस्तरीय फी आकारण्याची पद्धत स्वीकारण्यात येत आहे. हा बदल जागतिक पातळीवर झालेल्या व्हिसा शुल्कातील वाढीला आणि व्हिसा अर्जप्रक्रियेतील सुधारणांना अनुसरून आहे.

व्यापार आणि पर्यटन-संबंधी व्हिसा अर्जदार (बी १, बी २), पथक अथवा मोठ्या विमान/बोटीतील घटक सदस्य (सी१/ डी), विद्यार्थी (एफ अथवा एम) आणि सांस्कृतिक/शैक्षणिक आदान-प्रदानातील सहभागी (जे) या गटांतील अर्जदारांकडून या पुढे १४० $ फी आकारण्यात येईल आणि त्यांना पांढऱ्या रंगाची पावती मिळेल. अमेरिकेत रोजगार मिळवण्यासाठी याचिकेद्वारे व्हिसा अर्ज करणाऱ्यांना (एच, एल, ओ, पी, क्यू, आणि आर गट) १५० $ फी भरावी लागेल आणि त्यांना हिरवी पावती मिळेल. पूर्वीप्रमाणे एचडीएफसी बँकेच्या अधिकृत शाखांमध्ये पैसे भरून या पावत्या मिळतील. के गटातील अर्जदारांना (वाग्दत्त वधू/वर) आता ३५०$ भरावे लागतील आणि त्यांनी पूर्वीप्रमाणे व्हिसा विभागामध्ये पैसे भरायचे आहे.

ज्या अर्जदारांनी जून ४, २०१० पूर्वी व्हिसा अर्ज भरले आहेत, त्यांनी वाढलेले शुल्क व्हिसा मुलाखतीच्या वेळेला भरावे. पूर्वी सर्व व्हिसा अर्जांसाठी १३१ $ भरावे लागत होते. परंतु अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने आता नवीन द्विस्तरीय पद्धत स्वीकारली आहे.

अमेरिकेत रोजगार मिळवण्यासाठी याचिकेद्वारे व्हिसा अर्ज करणाऱ्यांच्या अर्ज प्रक्रियेला अधिक वेळ लागत असल्यामुळे त्या अर्जांची वेगळी विभागवारी केली गेली आहे. त्याच बरोबर व्हिसा अर्जांच्या प्रक्रियेतील अनेक गतिमान बदल हे देखील ह्या विभागवारीमागील कारण आहे. शिवाय बनावट व्हिसा करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्याच्या प्रक्रियेतही सुधारणा झाल्यामुल्ये, व्हिसा फी आता वाढली आहे.

केवळ भारतातच व्हिसा विभागात गेल्या चार वर्षात ४० % हून अधिक कर्मचाऱ्यांची भरती अमेरिकी सरकारने केली आहे. अमेरिकी सरकारने १०० मिलियन $ ची गुंतवणूक व्हिसा विभागाला अद्ययावत करण्यात केली आहे. हैदराबादला नवीन वाणिज्य वकीलात, मुंबईत बांधली जात असलेली नवीन वकीलात आणि नवी दिल्लीमधील व्हिसा विभागाचे नूतनीकरण हे सर्व व्हिसा अर्ज प्रक्रियेला अधिक सुकर करण्याचे प्रयत्न आहेत.

अमेरिकी व्हिसा -संबंधी सर्व माहिती आपणास http ://mumbai .usconsulate.gov /non-immigrant _visas .html वर मिळेल. नवीन पद्धतीबद्दल आपण mumbaiNIV @state .gov ला विचारू शकता.